# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **रॉयल कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स या महाविद्यालयाची स्थापना संस्थापक प्राध्यापक अ.ई. लकडावाला यांनी जून 1989 मध्ये दर्जेदार शिक्षणाच्या उदात्त आकांक्षेने केली. या महाविद्यालयाला ऑगस्ट 2019 मध्ये राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (NACC) द्वारे "A" श्रेणी (3rd Cycle) प्रदान करण्यात आली.**

महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने शनिवार दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी “पर्यावरण शाश्वतता – वैज्ञानिक, आर्थिक आणि सामाजिक परिणाम” या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेचा उद्देश सहभागीं प्राध्यापक, विद्यार्थी यामध्ये पर्यावरणीय शाश्वततेच्या क्षेत्रातील नवीनतम घडामोडी आणि संशोधना बद्दल माहिती करून घेणे व पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणे होता.

रॉयल कॉलेजचे संस्थापक आणि अध्यक्ष, प्राध्यापक अ.ई लकडावाला, व्यवस्थापक विश्वस्त, मलेका बूटवाला आणि झैनब वलीकरीमवाला हे या परिषदेचे मुख्य आश्रयदाते होते.

संमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ.कल्पना पाटणकर जैन, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक झमानत सय्यद होत्या .उपप्राचार्य डॉ.चित्रलेखा कोटियन आणि डॉ.संचिता दत्ता, डॉ.अकीला कुरेशी व इतर प्राध्यापक यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी खूप परिश्रम घेतले.

उद्घाटन सत्राचे प्रमुख पाहुणे मा. श्री. संजय श्रीपतराव काटकर, आयुक्त मरिा भाईंदर महानगरपालिका हे होते. आयुक्त सरांनी आपल्या भाषणात व्यक्त केले की, त्यांना ग्रामीण जीवनशैलीबद्दल प्रचंड आत्मीयता आहे. मिरा भाईंदर स्वच्छ आणि हिरवे ठेवणे हे त्यांचे ध्येय आहे त्यांनी त्यांच्या ह्या मिशनसाठी शैक्षणिक संस्थांची विद्यार्थ्यांच्या माध्यमातून मदत मागितली. मिरा भाईंदर स्वच्छ आणि हरित ठेवण्याबाबतचा हा संदेश त्यांना शहरातील सर्व समाज बांधवांपर्यंत पोहोचवायचा आहे. तसेच आयुक्तांनी रॉयल कॉलेज ने पर्यावरण संवर्धनाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी घेतलेल्या प्रयत्नाचे कौतुक केले आणि महाविद्यालयाच्या स्वच्छ आणि हरित परिसरासाठी व्यवस्थापन आणि कर्मचारी यांचे अभिनंदन केले. त्यांनी केवळ निसर्ग/नैसर्गिक संसाधनांसाठीच नव्हे तर मानवी नातेसंबंधांसाठीही शाश्वततेची गरज व्यक्त केली. स्वच्छ आणि हरित मरिा भाईंदरचा संदेश देताना त्यांनी मानवी नातेसंबंध सुद्धा दीर्घकाळ जपण्याचे आवाहन केले. या परिषदेच्या निमित्ताने गोषवारा पुस्तिकेचे प्रकाशन मा. आयुक्तांच्या हस्ते करण्यात आले.

मुंबई विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे डीन प्रा. शिवराम गर्जे हे ही सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रा. संजय साने, डीन टी.आय.एफ.आर. बेंगळुरू यांनी बीज भाषण केले. प्रा. विश्वनाथ आर. पाटील, संचालक NCNNUM, मुंबई विद्यापीठ आणि प्रा. देबेंद्र के. नायक, NEHU, शिलाँग हे प्रमुख व्याख्याते होते.

परिषदेत भारताच्या विविध भागातून एकूण १८४ प्रतिनिधी सहभागी झाले होते. ५६ प्रतिनिधींनी तोंडी सादरीकरण व 57 प्रतिनिधींनी पोस्टर सादरीकरण केली. उत्कृष्ट तोंडी आणि पोस्टर सादरीकरणास पारितोषिक देण्यात आले. अशाप्रकारे सहभागींच्या सकारात्मक प्रतिसादाने परिषदेचा समारोप झाला.